**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र: व.वि.श.म./ / /२५-२६**
**दिनांक : 22/08/2025**

# वसई विरार शहर महानगरपालिका

## पर्यावरण विभाग

### प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मूर्त्यां ओळखण्यासाठी मूर्तींना विशेष चिन्ह लावण्याचे मूर्तीकारांना निर्देश.

मा.उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्र.९६/२०२४ मधील दि.०९/०६/२०२५ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार मुर्तीकारांना प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) पासून मुर्त्या बनविण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि ही परवानगी नागपूर खंडपीठाने रिट याचिका क्र.४१७२/२०१२ मध्ये दि.११/०९/२०१२ रोजी दिलेल्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याच्या अटीवर देण्यात आलेली आहे.

नागपूर खंडपीठाच्या निर्देशांनुसार मुर्तीकार आणि विक्रेते यांनी ओळख पटविण्यासाठी प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) पासून बनविलेल्या मूर्त्यांच्या मागच्या बाजूस तैल रंगात (OIL PAINT) लाल रंगाचे ओळखण्याजोगे चिन्ह लावणे क्रमप्राप्त आहे. मूर्तीकारांनी असे ओळखचिन्ह लावूनच प्लास्टर ऑफ पॅरीसच्या (POP) मुर्त्यांची विक्री करावी.

वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुर्तीकारांनी व विक्रेत्यांनी प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) पासून बनविलेल्या मूर्त्यांच्या संदर्भात मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याचे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

पर्यावरण विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका